पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १६
<u>सभावृत्तांत</u>

दिनांक : २०/२/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शनिवार दि.२०/२/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.एकनाथ मोटे
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा.खोमणे लता हनुमंत
६. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
७. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.भंडारे-प्र.उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.एकनाथ मोटे अनुमोदक : मा.स्मिता गुंजेकर

शुक्रवार दिनांक ०५/०३/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------------

मा.सभापती :- शुक्रवार दिनांक ०५/०३/२०१० रोजी दुपारी १.४५ पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिति
कार्यपत्रिका क्रमांक : १६
सभावृत्तांत
(दि.२०.२.२०१० ची तहकूब सभा)

दिनांक : ५/३/२०१० वेळ : दुपारी १.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.२०.२.२०१० ची तहकूब सभा शुक्रवार दि.०५/३/२०१० रोजी दुपारी १.४५ वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.एकनाथ मोटे
४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५. मा.खोमणे लता हनुमंत
६. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
७. मा.बाबर प्रकाश धरमसी

याशिवाय मा.काळे-नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.लता खोमणे

शुक्रवार दिनांक १९/०३/२०१० रोजी दुपारी १.३० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.
सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------------

मा.सभापती :- शुक्रवार दिनांक १९/०३/२०१० रोजी दुपारी १.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १६
सभावृत्तांत
(दि.२०.२.१०,०५.०३.१० ची तहकूब सभा)

दिनांक : १९/३/२०१० वेळ : दुपारी १.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दि.०५.०३.२०१०ची तहकूब सभा शुक्रवार दि.१९/०३/२०१० रोजी दुपारी १.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.एकनाथ मोटे
३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
४. मा.खोमणे लता हनुमंत
५. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.देशमुख-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव,मा.चिंचवडे-कार्य.अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

(अ) दिनांक १५.१.२०१० व ५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

(ब) दिनांक ५.२.२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------------

ठराव क्रमांक :- २६४ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१५/२०१० दि.६.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.साहेबराव गायकवाड, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २५/०९/२००९ पासून एक वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २६५ विषय क्रमांक :- २

दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- प्रशासन

सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/१/कावि/६१/२०१० दि.११.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.ए.वाय.कारचे, मुख्याधिकारी गट - अ यांची सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर १ वर्ष कालावधीकरीता प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २६६ विषय क्रमांक :- ३

दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- विद्युत-भुगयो

सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७३/१० दि.२७.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

चिंचवड मैला शुध्दीकरण केंद्र त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु.२,०९,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २६७ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- विद्युत-भुगयो

सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७४/१० दि.२७.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्र टप्पा - १ त्रैवार्षिक कालावधीकरीता चालन देखभाल दुरुस्तीस देणेकामी र.रु. २,४१,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २६८ विषय क्रमांक :- ५

दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- विद्युत-भुगयो

सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर

संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/भुगयो/तां/३७५/१० दि.२७.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

भुगयो अंतर्गत वाल्हेकरवाडी पंप हाउस येथील पंपींग मशीनरींची चालन देखभाल व दुरुस्ती करणेकामी र.रु.४९,७७,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------------

ठराव क्रमांक :- २६९ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/१३८/२०१० दि.२७.१.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

१) श्री. दुगड उत्तमचंद गुलाबचंद (खुला) २) श्री. राउत शांताराम नामदेव (इमाव) ३) श्रीम. पार्टे कांचनमाला प्रकाश (खुला दि.१६/२/१०रोजी पात्र)या कार्यालय अधिक्षक (नायब तहसिलदार) पदावरील कर्मचा-यांना "प्रशासन अधिकारी" या पदावर र.रु. ९३०० - ३४८०० ग्रेड वेतन ५४०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नियुक्ती देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------------

ठराव क्रमांक :- २७० विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/०५/४५/२०१० दि.५.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुणे विभागातील पाच महानगरपालिका पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,कोल्हापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man-made disaster बाबत विशेष नियमावलीचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) (ए ए) अन्वये एकत्रितपणे प्रसिद्ध केलेल्या फेरबदल प्रस्तावावरील हरकती सुचना व मनपाचे अभिप्राय यावर विचार करुन अभिप्रायाप्रमाणे अहवाल पाठविणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------------

ठराव क्रमांक :- २७१ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/२१७/२०१० दि.८.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार श्री.आल्हाट प्रशांत पोपट यांना अनु.जाती प्रवर्गातून र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० या पे बॅन्डमध्ये भांडारपाल या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------------------

ठराव क्रमांक :- २७२ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- विद्युत अ प्रभाग
सुचक :- मा.एकनाथ मोटे अनुमोदक :- मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अप्र/वि/३९/२०१० दि.८.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

निगडी येथील विद्युत दाहिनीचे तीन वर्षांकरिता चालन देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.३१,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- २७३ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- १९/३/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :- मा.लता खोमणे अनुमोदक :- मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/२२०/२०१० दि.९.२.२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार श्री.जगधने रतन रामचंद्र यांना खुला (अनु.जाती) प्रवर्गातून र.रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० या पे बँडमध्ये मुख्य वाहनचालक या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ४०० /२०१०
दिनांक - २० /३ /२०१० चे लगत

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.